क्रमांक :- अजास- १४०६/प्र. क्र. १४/२२ - स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक २६ ऑक्टोबर, २००७

प्रति,
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय: मागासवर्गीयांसाठी आरक्षण सहकारी संस्थेमध्ये लागू करण्याबाबत ...**

उपरोक्त विषयावरील आपल्या कार्यालयाचे क्र. नाबँका/डी-४/सोलापूर ज. बँक/२००७/२१००, दिनांक ९.८.२००७ चे अर्धशासकीय पत्र कृपया पहावे.

संदर्भाधीन पत्रान्वये, मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९२५/२००७ मध्ये केलेल्या विचारणेनुसार शासनाचे अर्थसहाय्य नसलेल्या सहकारी संस्था/बँकांना मागासवर्गीयांचा आरक्षण विषयक अधिनियम लागू आहे किंवा कसे याबाबतचे मार्गदर्शन करण्याबाबत शासनाकडे विचारणा करण्यात आलेली आहे. या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, ''महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधी सूचित जमाती (विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१'' मधील तरतुदी ज्या सहकारी संस्थांमध्ये शासनाचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य नाही अशा सहकारी संस्थांना देखील लागू होतात. अधिनियम क्र.८ मधील कलम २ मधील खंड 'ग' मध्ये 'आस्थापना' या संज्ञेची केलेली व्याख्या व त्या संदर्भात केलेले स्पष्टीकरण यामध्ये केलेल्या उल्लेखानुसार ज्यांना शासनाकडून मान्यता परवाना देण्यात आलेला आहे व ज्यांच्यावर शासनाकडून देखरेख किंवा नियंत्रण ठेवण्यात येते अशा संस्थांचा किंवा उद्योगांचाही अंतर्भाव''आस्थापना'' या संज्ञेत केला आहे. या संज्ञेनुसार सर्व सहकारी संस्थांना आरक्षणविषयक नियम व कायदा लागू होतो.

(मि. प. शेणॉय)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

जा. क्र. ना. प्रशासन/मा. वर्ग/आरक्षण/२००७
दिनांक ७ डिसेंबर २००७

प्रति,

१) कार्यासन अधिकारी,
ना. बँका शाखा,
मुख्यालय, पुणे

२) कार्यासन अधिकारी,
ना. पत संस्था,
मुख्यालय, पुणे

## विषय : मागासवर्गीयांसाठी आरक्षण सहकारी संस्थांमध्ये लागू करण्याबाबत.

उपरोक्त संदर्भात शासनाकडून प्राप्त प्रत क्र. अजास-१४०६/प्र.क्र. १४/२२-स दिनांक २६ ऑक्टोबर २००६ चे कृपया अवलोकन करावे. (प्रत सोबत जोडलेली आहे)

आपल्या कार्यासनाकडील अ.शा. पत्र क्र. नाबँका/डी-४/सोलापूर ज.बँक/२००७ दिनांक ९/८/२००७ व १२/११/२००७ अन्वये आपण शासनाकडे मागितलेले अभिप्राय या कार्यासनकडे प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त पत्रान्वये शासनाने असे कळविले आहे की, आरक्षण अधिनियम २००१ मधील तरतुदीनुसार शासनाकडून मान्यता परवाना दिलेल्या व देखरेख व नियंत्रित केल्या जाणाऱ्या सर्व संघटना व आस्थापनांना मागासवर्गीयांचे आरक्षण लागू होतात. त्यामुळे शासकिय अर्थसहाय्य प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष न मिळालेल्या सहकारी संस्थांनाही या तरतुदी लागू होतात.

मा. अप्पर निबंधक यांच्या मान्यतेने

(मिलिंद टांकसाळे)
उपनिबंधक (प्रशासन)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे